# फॅबटेक टेक्निकल कॅम्पस ,

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि रिसर्च,सांगोला

# मध्यवर्ती ग्रंथालय विभाग

---

# मराठी भाषा गौरव दिन

अहवाल

२७ फेब्रुवारी २०२६

Fabtech Technical Campus
College of Engineering & Research
The Future Begins Here.

Approved by AICTE, New Delhi; DTE (M.S.), Mumbai & Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere, Dist- Raigad & M.S.B.T.E., Mumbai.
DTE CODE- 6756 MSBTE Code-1615

दिनांक :२६/०२/२०२६

# नोटीस

महाविद्यालयातील पदवी व पदविका विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कळविण्यात येते कि, दि :२७/०२/२०२६ रोजी **मराठी भाषा गौरव** दिनानिमित्त आपल्या महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय विभागाकडून ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे.

वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने मध्यवर्ती ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदर ग्रंथ दिंडी आपल्या विभागात आल्यानंतर सर्वांनी उपस्थितीत राहावे.


Principal
Fabtech Technical Campus
College of Engg. & Research
Polytechnic, Sangola

Vice Principal
Fabtech Technical Campus
College of Engg.& Research,Sangola

PRINCIPAL
FABTECH TECHNICAL CAMPUS
COLLEGE OF ENGINTEERING
& RESEARCH, SANGOLA.


प्रत ,
१. डायरेक्टर
२. सर्व डीन
३.आय.क्यु ए सी
४.सर्व विभाग प्रमुख
५.ग्रंथालय विभाग


COLLEGE OF ENGINEERING & RESE... FTC LIBRARY SANGOLA

Fabtech Education Society

The Future Begins Here

# FABTECH TECHNICAL CAMPUS

Engineering (Autonomous) | Polytechnic

Pharmacy | School & Jr. College





8408888657 www.fabtecheducation.com

Fabtech Education Society, Pandharpur Road, Sangola, 413 307


व्याख्यान :-







COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA







COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA





COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA





COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA

# ग्रंथ दिंडी






COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA

सकाळ

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'फॅबटेक'मध्ये ग्रंथदिंडी

**सांगोला, ता. १ :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालय आणि मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आदाटे, इंजिनिअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, प्राचार्य तानाजी बुरुंगले आदींसह फार्मसीचे ग्रंथपाल प्रा. प्रकाश गाडेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथदिंडीच्या अग्रभागी फॅबटेक महाविद्यालयाचा चित्ररथ होता. या ग्रंथी दिंडीमध्ये विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत करून सहभाग झाले होते. यावेळी मराठी भाषेच्या गीताने दिंडीत चैतन्य निर्माण झाले होते. झेंडे, पारंपरिक पोशाख तसेच विद्यार्थ्यांच्या लाठी-काठीच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. मराठी भाषा व ग्रंथांचे महत्त्व सांगणारे घोषवाक्यांचे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेतले होते. या दिंडीत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथप्रेमी वाचक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**सांगोला :** येथील फॅबटेक कॉलेजमध्ये आयोजित ग्रंथ दिंडीच्या उद्‌घाटनप्रसंगी भाऊसाहेब रूपनर, डॉ. संजय आदाटे, डॉ. विद्याराणी क्षीरसागर व इतर.

हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के, दत्तात्रय शिंदे, विद्यार्थी आर्यन कोळी, साहिल वलेकर आदींसह महाविद्यालयातील पदविका विभागातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Solapur, Solapur-Today
02/03/2026 Page No. 7

COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC LIBRARY
SANGOLA

# फॅबटेक मध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भव्य ग्रंथ दिंडी

## फॅबटेक मध्यवर्ती ग्रंथालयाचा उपक्रम : ग्रंथपाल प्रा. सुधीर माळी यांची माहिती



सांगोला / वृत्तवेध :

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस आणि महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आदाटे, इंजिनिअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले आदींसह फार्मसीचे ग्रंथपाल प्रा. प्रकाश गाडेकर सह विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथदिंडीच्या अग्रभागी फॅबटेक महाविद्यालयाचा चित्ररथ होता. सुमारे २० हून अधिक विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेत या ग्रंथ दिंडीत सहभाग होता. या दिंडी सोहळ्यात स्पीकर्स द्वारे मराठी भाषेचे गीत लावण्यात आल्याने दिंडीत चैतन्य निर्माण झाले होते. झेंडा व पारंपरिक पोशाख आणि विद्यार्थ्यांच्या लाठी–काठीच्या प्रत्यक्षिकांनी लक्ष वेधले.

मराठी भाषा, ग्रंथ यांची महती सांगणारे घोषवाक्याचे फलक हाती घेत तर काही विद्यार्थिनींनी ज्ञानेश्वरी, दासबोध आदी ग्रंथ डोक्यावर घेत मराठीचा जागर केला. महाविद्यालयातील पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, फार्मसी कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेज आदी ठिकाणी जाऊन मराठी भाषेची जनजागृती करण्यात आली. या दिंडीत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग, ग्रंथप्रेमी वाचक आणि विद्यार्थी यात सहभागी झाले होते. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी उपक्रम फॅबटेक मध्ये राबविण्यात आला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी हा यामागचा मुख्य उद्देश होता. मराठी ही केवळ भाषा नसून ती आपल्या अस्मितेची, संस्कृतीची आणि परंपरेची ओळख असल्याची भावना यादरम्यान व्यक्त झाली. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के, दत्तात्रय शिंदे, विद्यार्थी आर्यन कोळी, साहिल वलेकर आदींसह महाविद्यालयातील पदविका विभागातील प्रथम वर्ष मधील अनेक विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC LIBRARY
SANGOLA

पुढारी

# फॅबटेकमध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथ दिंडी

**सांगोला : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस आणि महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



**सांगोला : फॅबटेकमध्ये आयोजित ग्रंथ दिंडीच्या उद्घाटनप्रसंगी भाऊसाहेब रूपनर, डॉ. संजय आदाटे, इंजिनीअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निक प्राचार्य तानाजी बुरूंगले, प्रा. सुधीर माळी व इतर.**

संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आदाटे, इंजिनीअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले आदींसह फार्मसीचे ग्रंथपाल प्रा. प्रकाश गाडेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथदिंडीच्या अग्रभागी फॅबटेक महाविद्यालयाचा चित्ररथ होता. विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेत या ग्रंथ दिंडीत सहभाग होता. या दिंडी सोहळ्यात स्पीकर्सद्वारे मराठी भाषेचे गीत लावण्यात आल्याने दिंडीत चैतन्य निर्माण झाले होते. झेंडा व पारंपरिक पोशाख आणि विद्यार्थ्यांच्या लाठी-काठीच्या प्रात्यक्षिकांनी लक्ष वेधले.

हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के, दत्तात्रय शिंदे, विद्यार्थी आर्यन कोळी, साहिल वलेकर आदींसह महाविद्यालयातील पदविका विभागातील प्रथम वर्ष मधील अनेक विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Solapur Edition
Mar 01, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH
FTC
LIBRARY
SANGOLA

# माणदूत एक्सप्रेस

01 Mar 2026 - Page 2
epaper.mandootexpress.com


## फॅबटेक मध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भव्य ग्रंथ दिंडी



सांगोला( प्रतिनिधी):-मराठी भाषा गौरव दिनानिमित्त फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस आणि महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आदाटे, इंजिनिअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले आदींसह फार्मसीचे ग्रंथपाल प्रा. प्रकाश गाडेकर सह विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथदिंडीच्या अग्रभागी फॅबटेक महाविद्यालयाचा चित्ररथ होता. सुमारे २० हून अधिक विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेत या ग्रंथ दिंडीत सहभाग होता. या दिंडी सोहळ्यात स्पीकर्स द्वारे मराठी भाषेचे गीत लावण्यात आल्याने दिंडीत चैतन्य निर्माण झाले होते. झेंडा व पारंपरिक पोशाख आणि विद्यार्थ्यांच्या लाठी-काठीच्या प्रत्यक्षिकांनी लक्ष वेधले.

मराठी भाषा, ग्रंथ यांची महती सांगणारे घोषवाक्याचे फलक हाती घेत तर काही विद्यार्थिनींनी ज्ञानेश्वरी, दासबोध आदी ग्रंथ डोक्यावर घेत मराठीचा जागर केला. महाविद्यालयातील पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, फार्मसी कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेज आदी ठिकाणी जाऊन मराठी भाषेची जनजागृती करण्यात आली.

या दिंडीत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग, ग्रंथप्रेमी वाचक आणि विद्यार्थी यात सहभागी झाले होते. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी उपक्रम फॅबटेक मध्ये राबविण्यात आला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी हा यामागचा मुख्य उद्देश होता. मराठी ही केवळ भाषा नसून ती आपल्या अस्मितेची, संस्कृतीची आणि परंपरेची ओळख असल्याची भावना यादरम्यान व्यक्त झाली.

हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के, दत्तात्रय शिंदे, विद्यार्थी आर्यन कोळी, साहिल वलेकरआदींसह महाविद्यालयातील पदविका विभागातील प्रथम वर्ष मधील अनेक विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

LIBRARIAN,
COLLEGE OF ENGINEERING
AND RESEARCH, SANGOLA

Vice Principal
Fabtech Technical Campus
College of Engg.& Research,Sangola

PRINCIPAL
FABTECH TECHNICAL CAMPUS
COLLEGE OF ENGINTEERING
& RESEARCH, SANGOLA